# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.02.2025** **वारःमंगळवार**

---

1. संसदेत राष्ट्रपतीच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्तावावर चर्चेला सुरूवात.
2. दिल्ली विधानसभेसाठी उद्या होणाऱ्या निवडणुकीची तयारी पूर्ण
3. जम्मू आणि काश्मिरच्या सुरक्षेबाबत केंद्रीय गृहमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक आणि
4. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पंजाबच्या मेहक शर्माचे तीन नवे राष्ट्रीय विक्रम

**<u>लोकसभा-राज्यसभा-अभिभाषण चर्चा</u>**

संसदेच्या दोन्ही संभागृहांत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्तावावर चर्चेला सुरुवात झाली. लोकसभेत भाजपाचे रामवीर सिंह बिधुरी यांनी आभार प्रस्ताव मांडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने केलेल्या कामांची आणि लोककल्याणकारी योजनांची माहिती त्यांनी दिली. तत्पूर्वी कामकाज सुरू होताच महाकुंभमेळयातील चेंगराचेंगरीच्या घटनेवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. या दुर्घटनेची सभागृहात चर्चा करावी, मृतांची नावे सादर करावीत, अशी मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केली. राष्ट्रपतींचं भाषण गेल्या वर्षांसारखेच होतं असं सांगत, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर विविध मुद्दयावरून टीका केली; देशातील बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित करत बेरोजगारीची समस्या सोडवण्यात सरकार अपयशी ठरल्याचं गांधी म्हणाले. राज्यसभेत भाजपा खासदार किरण चौधरी यांनी चर्चेला सुरुवात केली. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पावलं उचलल्याचं ते म्हणाले. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी बेरोजगारी, महागाई आणि रुपयाची घसरण हे मुद्दे या चर्चेत उपस्थित केले. राज्यसभेत देखील महाकुंभमेळ्यामधील दुर्घटनेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. या आणि इतर मुद्यावर आलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावले. त्याच्या निषेधार्थ कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि अन्य पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<u>रेल्वे विकास</u>**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात रेल्वेच्या आधुनिकीकरण आणि विकासासाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींची सविस्तर माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना दिली. महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल आदी विविध राज्यांमध्ये रेल्वेच्या विस्तारासाठी करण्यात आलेल्या तरतुदींची माहिती त्यांनी दिली. ओडिशातील 59 रेल्वे स्थानके अमृत स्थानके म्हणून विकसित करण्यात येणार असून त्यासाठी 2 हजार 379 कोटी रुपयांची तरतूद या आर्थिक वर्षात करण्यात आली आहे. तर महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी 23 हजार 778 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आल्याचं वैष्णव म्हणाले. सध्या राज्यात 1 कोटी 7 लाख रुपये मूल्यांची रेल्वे प्रकल्प प्रगतीपथावर असून, मुंबईतल्या उपनगरीय रेल्वेची क्षमता वृद्धींगत कऱण्यासाठीचे प्रयत्न सुरू असल्याचं ते म्हणाले. नव्या रेल्वेमार्गांसाठी 16 हजार 240 कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याचंही त्यांनी सांगितलं. पश्चिम बंगालमध्येही, रेल्वे सुविधांच्या अधुनिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. पश्चिम बंगामध्येही अमृत स्थानक कार्यक्रमांतर्गत स्थानकांचे पुनर्नवीकरण केलं जात आहे. बंगालमध्ये लवकर नमो भारत रेल्वेही सुरू करणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>दिल्ली निवडणूक</u>**

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी उद्या होणाऱ्या निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. सकाळी 7 ते संध्याकाळी 6 या वेळेत मतदान होणार आहे. एक कोटी 56 लाखांहून अधिक मतदार आपले मतदानाचं कर्तव्य बजावतीत अशी अपेक्षा आहे. 70 सदस्यीय विधानसभेसाठी 699 उमेदवार रिंगणात आहेत. निवडणुक प्रचाराचा कालचा शेवटचा दिवस होता. शनिवारी 8 फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**<u>जम्मू</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दिल्लीत जम्मू आणि काश्मिरच्या सुरक्षेबाबत आढावा बैठक घेणार आहेत. या बैठकीला जम्मू काश्मिरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, गृहसचिव गोविंद मोहन तसंच केंद्रीय गुप्तचर संस्थांचे प्रमुख तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहाण्याची अपेक्षा आहे.

**<u>माजी-सैनिक-मृत्यू</u>**

दक्षिण काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात काल झालेल्या दहशतवादी हल्ल्यात एका माजी सैनिकाचा मृत्यू झाला. कुलगाममधील बेहीबाग भागात दहशतवाद्यांनी माजी सैनिकांच्या कुटुंबावर हल्ला केला. यामध्ये त्यांच्या पत्नी आणि मुलगी जखमी झाली आहे. हल्ल्यानंतर तिघांनाही जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आलं, जिथे माजी सैनिक गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी आणि मुलीची प्रकृती स्थिर असल्याचं वृत्त आहे. हल्लेखोरांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी परिसरात शोधमोहीम तीव्र केली आहे.

**<u>महाकुंभ स्नान</u>**

भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आज प्रयागराज इथं महाकुंभला भेट देणार असून ते त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करतील. प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळयात काल वसंत पंचमीच्या मुहूर्तावर दोन कोटी 33 लाख भाविकांनी अमृत स्नान केलं. राज्य सरकारनं भाविकांच्या सुरक्षेसाठी जय्यत तयारी केली होती. अमृत स्नानाची सुरूवात 13 आखाड्यांच्या संत, साधूंनी केली आणि त्यानंतर भाविकांनी स्नान केलं. यावेळी संतांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव संगमस्थानावर पोहोचण्यासाठी आणि बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्गाचा वापर करण्यात आला होता. या परिसराच्या सुरक्षेससाठी ड्रोन, हेलिकॉप्टर आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवण्यात आली होती.

**<u>दोन हजार</u>**

गेल्या महिन्याच्या 31 तारखेपर्यंत 2 हजार रुपयांच्या 6 हजार 577 कोटी रुपये मूल्याच्या नोटा चलनात असल्याची माहिती रिझर्व्ह बँकेनं निवेदनाद्वारे दिली आहे. मे 2023 मध्ये चलनात असलेल्या साडेतीन लाख कोटी रुपये मूल्याच्या चलनी नोटांपैकी 98 टक्के नोटा आरबीआयकडे परत आल्या आहेत. 19 मे 2023 रोजी रिझर्व्ह बँकेने 2 हजार रुपयांच्या नोटा चलनातून बंद करण्याची घोषणा केली होती आणि नागरिकांना 7 ऑक्टोबर 2023 पर्यंत त्या बँकांमध्ये जमा करण्याचे किंवा बदलण्याचे आवाहन केले होते. 2000 रुपयांची नोट कायदेशीर चलन म्हणून अद्यापही कायम आहे, टपाल खात्याद्वारे आरबीआयच्या इश्यू ऑफिसपैकी कोणत्याही ठिकाणी या नोटा जमा करता येतील किंवा बदलता येतील असं आरबीआयनं कळवलं आहे.

**<u>डोनाल्ड ट्रम्प</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिकोवर लादलेली अतिरिक्त करवाढ एक महिना विलंबानं लागू होईल असं जाहीर केलं आहे. मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांच्याशी द्विपक्षीय स्तरावर मैत्रीपूर्ण चर्चा झाल्यानंतर आपण हा निर्णय घेतल्याचा खुलासा ट्रंप यांनी केला. फेंटानिल औषधाची अवैधरित्या होणारी तस्करी आणि बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रवाह रोखण्यासाठी अमेरिका-मेक्सिको सीमेवर 10 हजार सैनिकांची तैनाती करण्यास सहमती झाली आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन

ट्रुडो यांच्याशीही आपण चर्चा करत असल्याचं ट्रंप यांनी सांगितलं. मेक्सिको, कॅनडातून आणि चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर आजपासून अमेरिकेत अतिरिक्त कर आकारणी प्रस्तावित होती.

**<u>कांगो युद्धबंदी</u>**

कांगोमध्ये रवांडा समर्थित बंडखोरांनी एकतर्फी युद्धबंदीची घोषणा केली. गेल्या आठवड्यात कांगो लष्कर आणि बंडखोरांमध्ये झालेल्या चकमकीत किमान 900 लोकांचा मृत्यू झाल्याचं जागतिक आरोग्य संघटनेने म्हटलं आहे. बंडखोरांनी गोमा हे प्रमुख शहर ताब्यात घेतले होते तर बुकावू ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं वृत्त आहे. वांशिक संघर्षामध्ये या युद्धाचे मूळ आहे.

**<u>सीरिया स्फोट</u>**

सीरियामध्ये झालेल्या कारबॉम्ब स्फोटात, किमान 20 जण ठार झाले असून त्यात महिलांचा समावेश असल्याचं वृत्त सीरिया सिव्हिल डिफेन्सने दिले आहे. मनबीजच्या मुख्य रस्त्यावर हा स्फोट झाला. सीरियाच्या राष्ट्रपती कार्यालयाने या हल्ल्याचा निषेध केला आहे. अद्याप कोणत्याही गटाने या बॉम्बस्फोटाची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

**<u>टेबल टेनिस</u>**

सिंगापूर इथं झालेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेत, भारताच्या मिश्र दुहेरीची जोडी मानुष शाह आणि दिया चितळे यांचा 16 व्या फेरीतला सामना आज मेक्सिकोच्या जोडीशी होणार आहे. महिला दुहेरीच्या 32 व्या फेरीत, भारताच्या आयहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी चा सामना थायलंडच्या जोडीशी होणार आहे. महिला एकेरीत, भारतीय स्टार श्रीजा अकुला सोमवारी चीनच्या हे झुओजियाकडून पराभूत झाली तर मनिका बत्राही पराभूत झाली. यशस्विनी घोरपडेचाही जपानच्या मिवा हरिमोतोकडून 3-0 असा पराभव झाला. पुरूष एकेरीत, भारताचे अचंता शरथ कमल आणि मानव ठक्कर हे दोघेही पहिल्या फेरीतच बाहेर पडले.

**<u>राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा</u>**

उत्तराखंडमध्ये सुरु असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत काल झालेल्या महिलांच्या 50 मीटर रायफल 3 प्रकारात पंजाबच्या सीफ्ट कौर सामरानं सुवर्णपदक पटकावलं. पुरुषांच्या 10 मीटर पिस्तूल स्पर्धेत कर्नाटकच्या जोनाथन अँथनीने सुवर्णपदक जिंकलं. भारत्तोलन स्पर्धेत पंजाबच्या मेहक शर्मानं महिलांच्या 87 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावत तीन नवे राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले. पुरुषांच्या गटात, सेनादलाच्या लवप्रीत सिंगनं एकूण 367 किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले, तर उत्तराखंडच्या विवेक पांडेने कास्यपदक पटकावलं. स्क्वॅश स्पर्धेत, तामिळनाडूच्या वेलावन सेंथिलकुमार आणि गोव्याच्या आकांक्षा साळुंखे यांनी सुवर्णपदक जिंकले. महाराष्ट्राच्या अंजली सेमवाल आणि राहुल बैथाचा यांना पराभवाचा सामना करावा लागला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.